स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड

RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तवी २० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# धनंजय मुंडे म्हणजे गॉन केस! असे म्हणणाऱ्या दमानिया यांनी खालची पातळी सोडून बोलू नये!!

## दसरा मेळाव्यात वाल्मीकचे पोस्टर झळकल्याने ना. पंकजा मुंडे यांच्यावर अंजली दमानिया यांचा हल्लाबोल

## आपला मेळावा साध्या, फाटक्या अन् कष्टकरी माणसांचा, असे म्हणत पंकजा मुंडे यांनी बॅनर झळकवणाऱ्यांना झापले!

## अंजली दमानिया म्हणाल्या एक सुद्धा बॅनर झळकला असेल तर आपण सर्वांनी मान शरमेने खाली घालणे गरजेचे!

## सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांचे वक्तव्य वैयक्तिक भांडणासारखे!!

बीड : मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्ह्यातील सावरगाव घाट येथे दसरा मेळावा पार पडला. मात्र, यंदाच्या मेळाव्यात एका प्रसंगामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. काही तरुणांच्या हातात सरपंच देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड फोटो झळकले. यावरून अंजली दमानिया यांनी पंकजा मुंडे यांच्यावर निशाणा साधला आहे. पंकजा मुंडेंना वैयक्तिकरित्या वाल्मिक कराडे याच्याबाबत काय वाटते? असे प्रश्न पंकजा मुंडे यांना विचारले पाहिजेत, असे दमानिया म्हणाल्या. तसेच यावेळी त्यांनी धनंजय मुंडे यांना गॉन केस म्हंटले.



### आमचा मेळावा हा साध्या, फाटक्या आणि कष्टकरी माणसांचा : पंकजा मुंडे

● भाजपाच्या नेत्या तथा राज्याच्या कॅबिनेट मंत्री पंकजा मुंडे यांचा आज भगवानगडावर दसरा मेळावा झाला. यावेळी पंकजांनी आपला मेळावा साध्या, फाटक्या अन् कष्टकरी माणसांचा असल्याचे नमूद करत त्यांच्यासाठी यापुढे कायम संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त केला.

● आपण नवरात्रात नऊ दिवस देवीची पूजा केली. त्या देवीने महिषासुर व रक्तबीजासारखा राक्षस संपून टाकला.

● आजच्या कलियुगातही असे



राक्षस जन्माला आलेत. यामुळे आपणही या जातीपातीच्या राक्षसांचा नाश केला पाहिजे, असे त्या यावेळी म्हणाल्या.

### अंजली दमानिया नेमके काय म्हणाल्या!

● या प्रकरणावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी प्रतिक्रिया देताना पंकजा मुंडेंवर हल्लाबोल केला. मला हे ऐकून अतिशय धक्का बसला आहे.

● एक सुद्धा बॅनर झळकला असेल तर आपण सर्वांनी मान शरमेने खाली घालणे गरजेचे आहे. या राजकारणात आता इतकी विकृती आलेली आहे. लोकांच्या मानसिकतेत इतकी विकृती आली आहे, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

● इतक्या खालच्या दर्जाची कृत्य करून सुद्धा या लोकांचे अशा पद्धतीने बॅनर झळकत असतील तर पंकजा मुंडे यांना घेराव घालून याबाबत प्रश्न विचारला पाहिजे, असे दमानिया यांनी म्हटले आहे

### धनंजय मुंडे गॉन केस!

● पंकजा मुंडेंना वैयक्तिकरित्या वाल्मीक यांच्याबाबत काय वाटते असे प्रश्न पंकजा मुंडे यांना विचारले पाहिजे, असे दमानिया म्हणाल्या. धनंजय मुंडे यांना याबाबत विचारून काही फायदा नाही, कारण ती गॉन केस आहे, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला.

### दसरा मेळाव्यात तरुणांनी काय केले?

● पंकजा मुंडे यांच्या दसरा मेळाव्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपी वाल्मीक कराडचे पोस्टर्स झळकवण्यात आले. काही तरुणांनी आपल्या हातात वाल्मीक कराडचे फोटो घेतले होते. 'We support wakmik anna', 'कराड आमचे दैवत' असा मजकूर या पोस्टरवर होता. या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. यामुळे काहीसा वाद निर्माण झाला आहे.

## मस्साजोग येथे महिलेचा विनयभंग करून दिली जिवे मारण्याची धमकी

➤ केज : वसंत सोनवणे

केज तालुक्यातील मस्साजोग, ता. केज. जि. बीड येथे 65, वर्षीय महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना दि, 30/9/2025 मंगळवार, रोजी घडली असून अरोपी विरोधात केज पोलिस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तालुक्यातील मस्साजोग ता. केज. जि. बीड. येथील एका 65, वर्षीय महिलेचा वाईट हेतूने हाताला धरून ओढत घरात चल म्हणून विनयभंग करण्यात आला सदरील महिला आपल्या राहत्या घरासमोरील मोकळ्या जागेतील गवत काढत असताना आरोपी अनंत मंचकराव देशमुख तेथे आला व माझ्या हाताला धरून वाईट हेतूने घरात चल म्हणून मला ओढू लागला त्यावेळी मी आरडा ओरड केली असता माझे पती तेथे धावत आले त्यावेळी मला व माझे पतीला तुझ्याकडे बघतो म्हणून.. जीवे मारण्याची धमकी देवून पळून गेला. याप्रकरणी केज पोलिस स्टेशनला अरोपी विरोधात




महिलेच्या फिर्यादी वरून Bns, 2025,74, Bns, 2025,,352, Bns, 2025,351(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून केज पोलिस स्टेशनचे प्रभारी पी. आय. उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब सानप हे पुढील तपास करत आहेत.

## सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगवी पाटण येथे भव्य सुरुवात

### साधू संत येती घरा तोची दिवाळी दसरा : ह.भ.प उमेश महाराज दशरथे

➤ आष्टी : समीर शेख

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव (सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव) तसेच ब्रह्मलीन संतश्री महंत शंकरपुरी मंगळपुरी महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव सोहळ्याची सुरुवात गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी वैराग्यमूर्ती श्री सुदर्शन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली झाली आहे. ज्ञानोबारायांच्या ७५ व्या जन्मोत्सवाच्या पावन निमित्ताने ● पान २ वर...




## चित्रकार कु. प्रियंका चंद्रहंस गुरव हिला उत्कृष्ट गुणगौरव विद्यार्थिनी म्हणून पुरस्काराने सन्मानित



➤ पुणे : प्रतिनिधी

भारती विद्यापीठ पुणे अभिजीत दादा कदम मित्र मंडळ व प्रतिष्ठान ट्रस्ट कोथरूड पुणे आयोजित गुणगौरव पुरस्कार समारंभ पार पडला. विशेष पुरस्कार चित्रकार कु. प्रियंका चंद्रहंस गुरव हिला उत्कृष्ट गुणगौरव विद्यार्थिनी म्हणून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड. रामचंद्र कदम उर्फ चंदू शेठ नगरसेवक पुणे महानगरपालिका यांच्यासह डॉ. काकासाहेब जाधव, डॉ सुहास मोहिते, प्रा. सागर खळतकर, प्रा. सुनील पवार, सागर सुबराव कदम असे अनेक मान्यवर उपस्थित होते.



### नुकसानीची भरपाई तत्काळ मिळावी

### ➤ माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांचा प्रशासनाला इशारा

## आपत्तीग्रस्तांना तात्काळ मदत करा; पुणे पॅटर्न लागू करा!

➤ कन्नड : विशाल भालेराव

राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यांत भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा संकटात तातडीने आणि प्रभावी मदत पोहोचवण्यासाठी 'पुणे पॅटर्न'चा अवलंब करावा, अशी ठाम मागणी माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी केली आहे.

या मागण्यांसाठी जाधव यांनी कन्नड तहसील कार्यालयावर मोर्चा नेला. नुकसानीची भरपाई तत्काळ मिळावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. जाधव म्हणाले, मदत व पुनर्वसन विभाग, पुणे यांनी २७ मार्च २०२३ रोजी जारी केलेल्या शासन आदेशानुसार 'पुणे पॅटर्न'द्वारे सरकार 'उणे बजेट'चा पर्याय वापरून बाधितांना तातडीने मदत करू शकते. पण प्रत्यक्षात सरकार वेळकाढूपणा करते. त्यांनी सरकारवर टीका करताना पुढे म्हटले, "शेतीचे प्रचंड नुकसान झाले असताना सरकारचे लक्ष बहिणींना पैसे देण्यात आहे, पण विद्यार्थिनींच्या शिष्यवृत्तीसाठी मात्र निधी नाही. बेरोजगारी वाढत असून, भरती प्रक्रिया ठप्प आहे. जातीपातींच्या नावाने समाजात फूट पाडली जात आहे. अशा स्थितीत शेतकरी, तरुण आणि सुशिक्षित बेरोजगार हे सगळ्यात जास्त भरडले जात आहेत."

यावेळी माजी आमदार उदयसिंह राजपूत यांनीही नुकसानग्रस्त भागांचे तात्काळ व सरसकट पंचनामे करून मदत देण्याची मागणी केली. तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे व प्रशांत काळे यांनी निवेदन स्वीकारले आणि शासनाच्या आदेशानुसार लवकरात लवकर मदत वितरित केली जाईल, असे आश्वासन दिले.




## ४ ते ७ ऑक्टोबर दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता

पुणे/मुंबई : भारतीय हवामान विभागाने (IMD) अरबी समुद्रात विकसित होत असलेल्या 'चक्रीवादळ शक्ती'च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांसाठी इशारा जारी केला आहे. ४ ते ७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वारा आणि समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ● पान ४ वर...

# ट्रॅक्टर धुण्यासाठी गेलेल्या चार मुलांचा धरणाच्या पाण्यात बुडून मृत्यू

**अहो तहसीलदारसाहेब....पुन्हा एकदा मुरूम उपसा करणाऱ्या मुरूम माफियामुळे गेला चार निष्पाप जिवांचा बळी**



गंगापूर :गुलाब वाघ
दसऱ्याच्या मंगलमय दिवशी वाळूज परिसरात घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. ट्रॅक्टर धुण्यासाठी गेलेल्या चौघांचा टेम्भापुरी धरणाच्या पाण्यात बुडून मृत्यू झालाआहे. गुरुवार (दि. २ ऑक्टोबर) दुपारी लिंबे जळगाव शिवारात ही भीषण दुर्घटना घडली.

मृतांमध्ये इमरान इसाक शेख (२०), इम्मु इसाक पठाण (१०), जैन बाबू पठाण (१०) व गौरव दत्तू तारक (१०) या चौघांचा समावेश आहे. इमरान हा ट्रॅक्टर धुण्यासाठी पाण्यात उतरला असता त्याच्यासोबत गेलेल्या तीनही मुलांनाही आत ओढले गेले व दुर्दैवाने चौघांचाही बुडून मृत्यू झाला .स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत चौघांना बाहेर काढून तातडीने शिवराई टोल नाक्याजवळील सीएसएमएसएस रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह पुढील तपासासाठी घाटी रुग्णालयात रवाना करण्यात आले. घटनेची माहिती मिळताचवाळूज पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र सहाने, उपनिरीक्षक संदीप वाघ, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दशरथ खोसरे, अंमलदार पांडुरंग शेळके, स्वप्निल खाकरे व ज्ञानेश्वर राऊतयांनी घटनास्थळी धाव घेतली.
या दुर्दैवी घटनेमुळे लिंबे जळगाव परिसरात शोककळा पसरली असून वाळूज पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

## अहो तहसीलदारसाहेब मुरूम माफियामुळे चार निष्पाप जिवांचा गेला बळी; आता तरी लक्ष द्या!

गंगापूर तालुक्यात चालू असलेल्या अवैध मुरूम उत्खननाबाबत दैनिक वास्तवने वेळोवेळी बातम्या प्रकाशित केल्या आहे मात्र अद्यापही महसूल प्रशासनाच्या कानावर ऊ जात नाही काल टेंभापूरी धरणात जे तीन अल्पवयीन मुले व एक युवक बुडाला व त्यांचा जागीच मृत्यू झाला यालाही कारणीभूत अवैध मुरम उपसा करणारे मुरम माफीयाच आहे संपूर्ण गंगापूर तालुक्यातील गायरान जमिनी व लघु मध्यम व बृहत पाझर तलावे व धरणे मुरूम माफियानी पोखरून खाल्ले आहे आठ ते दहा पुरुष मोठमोठाली खड्डे खोदून ठेवले आहे त्यामुळे अतिवृष्टीच्या पावसाच्या पाण्याने हे खड्डे भरले व पाण्याचा अंदाज येत नसल्याने अशा दुर्दैवी घटना घडत आहे व अहो तहसीलदारसाहेब....पुन्हा एकदा मुरूम उपसा करणाऱ्या मुरूम माफियामुळे गेला चार निष्पाप जिवांचा बळी आता तरी लक्ष द्या अशी म्हणण्याची वेळ पुन्हा एकदा गंगापूर तालुक्यातील जनतेवर आली आहे.



## दिनवाडा, सनव/देवळी रस्त्याच्या आंदोलकांच्या तोंडाला महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या अधिकाऱ्यांनी पुसली पाने!

**महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाचे अधिकारी न आल्याने अखेर शिल्लेगाव पोलिस ठाण्याचे बीट अंमलदार तात्याराव बेंद्रे यांनी स्वीकारले निवेदन**

लासूर स्टेशन :प्रतिनिधी
गंगापूर तालुक्यातील दिनवाडा व सनव देवळी या मुख्यमंत्री ग्रामसडक योजना झालेल्या रस्त्याचे काम एकदम निकृष्ट दर्जेचे झाले होते त्यामुळे तिन्ही गावातील गावकऱ्यांनी महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाच्या विरुद्ध माळीवाडगाव येथे कायगाव ते देवगाव रस्त्यावर रास्ता रोको काही दिवसापूर्वी केला होता त्यावेळी दोन्ही रस्त्याचे काम पूर्ण करून देण्याची मागणी महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाचे अधिकाऱ्यांनी मान्य केली होती मात्र त्या आश्वासनाला अधिकाऱ्यांनी दुर्लक्षित केल्यामुळे आज पुन्हा गावकऱ्यांनी माळीवाडगाव येथे रास्ता रोकोची हाक दिली होती तसे पत्रही महाराष्ट्र रस्ते विकास मंडळांच्या अधिकाऱ्यांना व पोलिसांना दिले होते मात्र तिन्ही गावातील गावकरी रस्ता रोको साठी माळीवाडगाव येथे एकत्र जमा झाले मात्र कुठलीही पूर्वकल्पना न देता रास्ता रोको आंदोलनाला सामोरे जाण्यासाठी अथवा निवेदन घेण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाचे एकही अधिकारी अथवा कर्मचारी हजर राहिला नाही दसरा सण असल्यामुळे अखेर शेवटी शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे बीट अंमलदार तातेराव बेंद्रे यांनी निवेदन स्वीकारले आंदोलनकर्त्यांनी मात्र गैरहजर राहणाऱ्या महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेच्या विरोधात आठ ऑक्टोबर रोजी पुन्हा एकदा रास्ता रोको आंदोलन करणार आहे अधिकारी आंदोलनाला गैरहजर राहिल्याने ग्रामस्थ संतप्त झाले होते. शिल्लेगाव पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी आंदोलनकर्त्यांची समजूत घालून आंदोलन तात्पुरते स्थगित केले होते. दोन ऑक्टोंबर रोजी कायगाव देवगाव राज्य मार्गावर सनव फाट्यावर सनव व दिनवाडा ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलनाचे आयोजन केले होते. सनव व दिनवाड्याला जाण्यासाठी सहा किलोमीटर अंतराचा डांबरी रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून काही महिन्यापूर्वी करण्यात आला होता. त्यानंतर दोनच महिन्यात रस्त्याची पूर्ण पणे वाट लागली आहे. हा रस्ता नव्याने करून द्यावा. अशी मागणी ग्रामस्थांनी लावून धरली आहे.

गुरुवारी होणाऱ्या नियोजित आंदोलनाचे निवेदन महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेला ग्रामस्थांनी काही दिवसापूर्वी दिले होते. विशेष म्हणजे या आंदोलनाचा ग्रामसभेत सर्वानुमते ठराव संमत झाला आहे. असे असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या आंदोलनाची दखल घेतली नाही. व त्याबाबत त्यांना कुठलीही लेखी व तोंडी सूचना दिली नाही. ग्रामस्थ त्यामुळे अधिकच संतप्त झाले होते.

आज विजयादशमी आहे. त्यात सरकारी सुट्टी. त्यामुळे तुम्ही आजचे नियोजित आंदोलन काही दिवसांसाठी स्थगित करा. अशी विनंती शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी ग्रामस्थांना केली. त्यांना प्रतिसाद देत ग्रामस्थांनी आजचे आंदोलन स्थगित करून आठ ऑक्टोंबर रोजी पुन्हा आंदोलन करणार असल्याचे लेखी पत्र शिल्लेगाव पोलिसांना दिले.

यावेळी सत्तार शेख, जुबेर पटेल, रावसाहेब कांबळे, विठ्ठल ढोंबरे, विलास ढोंबरे, दीपक मोरे, भागिनाथ सोनवणे, अजीम शेख, कैसर शेख, आदिल शेख, तौसीफ शेख, फिरोज शेख, असद शहा, रवींद्र ढोंबरे, सुरेश पवार, देविदास ढोंबरे, मुस्तफा शेख, ताजमोहम्मद शेख, आसिफ शेख, सलमान शेख, वसीम शेख, समीर शेख, हारुण शेख, कडूबाळ ढोंबरे, भागिनाथ ढोंबरे, राजेंद्र सोनवणे, विजय सोनवणे, अशोक गायके, राजेंद्र गायके, भगवान ढोंबरे, कैलास ढोंबरे, राजेंद्र सोनवणे, भगवान ढोंबरे, अर्जुन ढोंबरे, बारकू कोळेकर, विक्रम ढोंबरे, अंकुश म्हस्के, नवनाथ मगर, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ऑक्टोंबर रोजी पुन्हा रस्ता रोको

काल गुरुवारी रास्ता रोको आंदोलन नियोजित असून देखील महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेचा एकही अधिकारी ग्रामस्थांच्या आंदोलनाला उत्तर देण्यासाठी उपस्थित नव्हता हे त्यांच्या मुजोरपणाचे द्योतक म्हणावे लागेल आज गुरुवारी ग्रामस्थांचे ऐकून घेऊन त्यांचे प्रश्न सोडविणे गरजेचे होते परंतु ते गैरहजर राहिले. त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल व आठ ऑक्टोबर रोजी पुन्हा रास्ता रोको आंदोलनाचे हत्यार उपस्थित जाणार आहे जोपर्यंत सनव/देवळी व दिनवाडा या दोन्ही रस्त्याचे कामकाज नव्याने होत नाही तोपर्यंत ग्रामस्थांचा आक्रोश व आंदोलन चालूच राहतील असा इशाराही गावकऱ्यांनी दिला आहे.

**डॉ. गणेश ढोंबरे** (माजी सरपंच, दिनवाडा सनव/देवळी ग्रुप ग्रामपंचायत

# बीड जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धेत तानाजी काळेने पटकावला प्रथम क्रमांक

● सर्वस्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव ● श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

बीड :प्रतिनिधी
बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत 10 मीटर (वय गट :17) शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी तानाजी काळे याने यशस्वी कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळवत श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. चि. तानाजी काळे याच्या या उज्ज्वल यशाबद्दल त्याच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. 4 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तानाजी सुभाष काळे या विद्यार्थ्यांस पिस्तोल शुटिंगची लहानपणापासून आवड आहे. ही आवड जोपासण्यासाठी तो सातत्याने धडपड करत आहे. तो दररोज सराव करून या स्पर्धेत अधिक निपुण होण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. त्याने आता पर्यंत विविध स्पर्धासह शालेय स्तरावरील स्पर्धेत तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर पिस्तोल शुटिंग स्पर्धेत भाग घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. काल बुधवार दिनांक 01 ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धा 10 मीटर (वय गट :17) बलभीम महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी चि. तानाजी सुभाष काळे सहभागी झाला



होता. या स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळून त्याने श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्याच्या या यशाबद्दल त्याचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ सर, सचिव नामदेव वाघ सर, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, गावातील प्रतिष्ठित नागरिक राजेश भाऊ देवकते, संतोष नरवडे, त्याचे वडील सुभाष काळे, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह, नातेवाईक आणि मित्र परिवारांनी त्याचे अभिनंदन करून त्यास पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. येत्या 4 ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी त्याला सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

# केज शहरातील महात्मा फुलेनगर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा

केज : प्रतिनिधी
केज शहरातील महात्मा फुले नगर भागातील एल.एफ.सी. चौक येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे.
यावेळी केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून उपस्थित मान्यवरांच्या व उपस्थितांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप-दिपाणी पूजा करून वंदन करण्यात आले,यावेळी सामुदायिक बुद्ध वंदना ग्रहण करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षा सौ.सीताताई







बनसोड, धनराज सोनवणे, बाळासाहेब मस्के, अशोक गायकवाड, पत्रकार तात्या गवळी, प्रा. विठ्ठल समुद्रे, विठ्ठल जाधव, संदिपान गायकवाड, विवेक बनसोड, अमोल मिसाळ, किरण जोगदंड, राहुल इनकर, सुरज वैरागे, प्रेम मस्के, बालासाहेब जोगदंड, महादेव गायकवाड, धनराज भालेराव, आप्पा गायकवाड, प्रा.पवन सरवदे, समुद्रे दादा, ओम शिनगारे, संदेश ताकतोडे, आदर्श गवळी, महानंदा गायकवाड, मीरा गवळी, बबीता मस्के, विमल जोगदंड, लता वाघमारे, मस्के आक्का, सुमन घुमरे, ज्योती शिरसट, उजगरेबाई, काळे ताई, सावन लोंढे, धम्मानंद वाघमारे, प्रीतम मस्के यांच्यासह महात्मा फुले नगर भागातील बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप हा शरणतय घेऊन करण्यात आला.

# वसुंधरा पायी दिंडी 2025 चे केज शहरात जंगी स्वागत

केज :प्रतिनिधी
जगतगुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांची दिंडी दिनांक २८ सप्टेंबर २०२५, मराठवाडा येथील श्रीक्षेत्र माउली माहेर जिल्हा परभणी येथे वसलेल्या जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी स्थापित रामानंद संप्रदाय, मराठवाडा (परभणी) उपपीठाहून पायी दिडीचे प्रस्थान २८ सप्टेंबर २०२५ रोजी झालेले आहे. या पायी दिंडी मध्ये हजारो भाविक परभणी पासून श्रीक्षेत्र नाणीजधाम (रत्नागिरी) पर्यंत शेकडो किलोमीटरचा प्रवास पायी चालून जाणार आहेत. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या २१ ऑक्टोबर २०२५ रोजी ५९ वा वाढदिवस येत आहे. रामानंद संप्रदायाचे मुख्यपीठ नाणीजधाम येथे हा उत्सव या दिवशी अनेक वर्ष साजरा केला जातो. त्यादिवशी हि दिडी नाणीजधाम येथे दाखल होणार आहे. मराठवाडा (परभणी) उपपीठ सोबतच तेलंगणा उपपीठ, उत्तर महाराष्ट्र (नाशिक) उपपीठ, पूर्व विदर्भ( नागपूर) उपपीठ, मुंबई उपपीठ (वसई), पश्चिम महाराष्ट्र (पुणे) व गोवा या ७ उपपिठाहून देखील अश्याच प्रकारे पायी दिंड्या निघणार आहेत. या दिंडीला वसुंधरा पायी दिंडी असे नाव देण्यात आले आहे.

या दिडीतून, सध्या अत्यंत जिकरीच्या पण तेवढ्याच दुर्लक्षित असलेल्या ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर प्रकाश टाकला जात आहे. यावर केवळ संदेशच न देता त्यांच्या कृतीतूनही संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हजारो लोकांची खाण्या पिण्याची, राहण्याची, मलमूत्र विसर्जनाची, अंघोळीची सोय करताना पर्यावरणाला काहीही हानी होणार नाही याची काळजी आयोजकांकडून घेतली जात आहे. मागे कचरा होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी विशेष सेवेकरींचे पथक या दिंडीत सामील आहे. सोबत टॉयलेट व्हॅन देखील तैनात आहे, तसेच सोबत पिण्याचे पाणी, आणि स्वच्छतेसाठी लागणारे पाणी घेऊन २ स्वतंत्र टँकर्स देखील दिंडी सोबत कायम सज्ज आहेत. त्याचसोबत या दिंडीच्या माध्यमातून दरदिवशी वृक्षारोपण देखील केले जात आहे.

विशेष म्हणजे हि दिंडी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या एका बाजूने, एका रांगेत, एका तालात आणि लयीत, त्यांच्या सांप्रदायिक गजरावर चालत पुढे सरकत आहे. त्यांच्या वेशभूषा सुद्धा एका रंगसंगती मध्येच आहेत. एका तालावर चालताना वर्दळीच्या भागात हि दिंडी ग्लोबल वॉर्मिंगवर संदेश देताना आढळून आली. अश्याप्रकारे वसुंधरा पायी दिंडीचे हे सलग तिसरे वर्ष आहे आणि तेही नवीन २ दिंडींसह, जी एक वाखाणण्याजोगी बाब आहे. यातून संस्थानाचा एक चांगला उपक्रमच नाही तर त्यांचे सातत्य आणि चिकाटीहि दिसून येते. या दिंडीमध्ये सहभागी भाविकांची सुद्धा विशेष काळजी घेतली जात आहे असे आढळून आले, कारण वेळेच्या वेळी सकस आहार पुरवला जात आहे, सोबत दिंडीमध्ये संस्थानाची एक ऍम्ब्युलन्स चालताना आढळून आली. ज्यात एक वैद्यकीय पथकहि सेवा देताना दिसून आले आहे. अशी हि आगळीवेगळी पायी दिंडी ज्यात फक्त



मध्यमवयीनच नाही तर युवा-युवती, महिला-पुरुष असे सर्व वयोगटाचे आणि सर्व सामाजिक वर्गातले भाविक दिसून आले. जगदगुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या प्रेरणेने अनेक समाजपयोगी उपक्रम राबवले जात आहेत, जसे महामार्गावरील ऍम्ब्युलन्स सेवा, मरणोत्तर देहदान, मरणोत्तर अवयव दान, गरीब मुलांसाठी मोफत CBSE बोर्डचे शिक्षण, सर्व जातीपंथांच्या मुला-मुलींसाठी मोफत वेदपाठशाळा, रक्तदान, व्यसनमुक्ती, आपत्कालीन सेवा, दुर्बल घटक पुनर्वसन या आणि अश्या अनेक उपक्रमांसाठी रामानंद संप्रदाय नेहमीच ओळखले गेला आहे. त्यांच्या या विविध समाजहितोपयोगी उपक्रमासाठी देखील समाजात विविध स्तरांवर यांचे कौतुक होत आहे. यासोबत दुग्धशर्करा योग म्हणजे हल्लीच घोषित करण्यात आलेली सरकारी योजना- 'एक पेड माँ के नाम :, जी या सलग ३ वर्षे सुरू असलेल्या वसुंधरा पायी दिंडीच्या पर्यावरणसंरक्षणाच्या प्रयत्नांना जोड देते. म्हणूनच विशेष कौतुकाची बाब म्हणजे आता रामानंद संप्रदायाने सरकारच्या या योजनेत सुद्धा हिरीरीने आणि सक्रिय सहभाग घेतला आहे. या दिंडींदरम्यान शेकडोंच्या संख्येने वृक्ष लागवड करण्याचा मानस पूज्यपाद जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून करण्यात आला आहे. केज मध्ये या दिंडीचे दुपारच्या जेवणाचे नियोजन व स्वागत करण्यात आले.

## सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाची सांगवी पाटण येथे भव्य सुरुवात

● पान १ वरून...आणि सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या शुभमुहूर्तावर सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाची आज भक्तीमय सुरुवात झाली.

या धार्मिक महोत्सवाचा प्रारंभ पहिल्या दिवसाची कीर्तनाची सेवा ह. भ.प उमेश महाराज दशरथे यांच्या विशेष कीर्तनाने झाला.

यावेळी महाराज म्हणाले पुण्य करणे सोप आहे, पाप करणे अवघड आहे, त्यांनी आपल्या कीर्तनातून भगवद्नामाचे महत्त्व, भक्तीमार्ग आणि आध्यात्मिक जीवनातील तत्त्वज्ञान यावर सखोल विवेचन केले. भाविकांच्या उत्साही उपस्थितीने संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला.

हा सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह हा ज्ञानोबारायांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील महत्त्वाचा भाग असून, समाजात आध्यात्मिक चेतना निर्माण करणे, सद्भावना वाढवणे आणि भगवद्नामाचा प्रसार करणे हे यामागचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

उर्वरित सहा दिवसांत विविध विद्वान संत, कीर्तनकार आणि महाराज यांच्या सादरीकरणाचा समृद्ध कार्यक्रम रचण्यात आला असून, सर्व भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री व आयोजक मंडळाकडून करण्यात आले आहे.

यावेळी कीर्तनाला सांगवी पाटण येथील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक भक्त भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर दुसऱ्या दिवसाची कीर्तनाची सेवा ह. भ.प ज्ञानेश्वर महाराज जळकीकर (जळगाव) यांचे होणार आहे. सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी कीर्तनाचा लाभ घ्यावा.

सांज दैनिक बीड
वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922





## आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे बौद्धजन फाउंडेशनच्यावतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

➤ आष्टी : प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला . आश्विन महिन्याच्या पौर्णिमेचा हा दिवस जगभरातील बौद्ध समाजासाठी एक ऐतिहासिक आणि धार्मिक दिवस म्हणून ओळखला जातो . हा तोच दिवस आहे, जेव्हा इ .स .पू . ५२३ च्या सुमारास गौतम बुद्धांनी उत्तर प्रदेशातील सारनाथ येथे पहिला उपदेश करून ‘ धम्मचक्र ’ प्रवर्तित केले होते . या दिवसालाच ‘ धम्मचक्र प्रवर्तन दिन ’ म्हणतात . भारतात, विशेषत : महाराष्ट्रातील नागपूर येथे हा दिवस अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला जातो .
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील खंडागळे यांनी केले यावेळी सामाजिक कार्यकर्ते समीर शेख ,विजय मरकड, प्रदीप खंडागळे व उपासिका यांनी मनोगत व्यक्त केली . समीर शेख मनोगत व्यक्त करताना सांगितले की धम्मचक्र” म्हणजे बुद्धांच्या शिकवणुकीचे चाक ( चक्र ) . “प्रवर्तन” म्हणजे गतिमान करणे . म्हणजेच, बुद्धांच्या धम्माच्या चक्राला पुन्हा एकदा गती देण्याचा दिवस .

यावेळी कार्यक्रमाला सांगवी पाटण गावचे सरपंच दत्तात्रय ( आबा ) खोटे, लक्ष्मण भोसले , विजय मरकड, गणेश खिलारे, राघव खिलारे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख , सुनील भैरू खंडागळे, सुनील बन्सी खंडागळे, बाळू खंडागळे, राजू खंडागळे, विकास खंडागळे, अजय बोराडे, अशोक वाघमारे, लक्ष्मण खंडागळे, प्रदीप खंडागळे, आबा वाघमारे, भैरू खंडागळे, आण्णा बोराडे, कैलास खंडागळे, राहुल खंडागळे, संतोष खंडागळे , गोरख वाघमारे, सागर खंडागळे व बौद्धजन फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## पैठण तालुक्यातील ठिकठिकाणी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन साजरा





पैठण : सर्जेराव खडसन

समता, बंधुता, न्याय, करुणा या महान मूल्यांना आचरणात आणण्याचा तसेच वंचित, शोषित, उपेक्षित अशा घटकांना नव्या आशा, आत्मविश्वास आणि प्रगतीचा मार्ग खुला करून देणारा दिवस म्हणजे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन या दिवशी बोधिसत्व डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा देऊन आपना सर्वांना अन्याय, विषमता, अंधश्रद्धा आणि भेदभाव यांचा त्याग करून समानतेचा मार्ग खुला करून दिला . याचे स्मरण ठेवून पैठण शहर, पिंपळवाडी राहुलनगर, मुधलवाडी, इसारवाडी, ढोरकिन व इतर गावातील सर्व आंबेडकरी जनता व बौद्ध उपासक उपासिकांनी तथागत गौतम बुद्ध, डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून बुद्ध वंदना घेत एकमेकांना शुभेच्छा देत ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन साजरा करण्यात आला .

पैठण शहर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने बस स्थानक परिसरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानात आयोजित केलेल्या ६९ व्या धम्म चक्र अनुप्रवर्तन कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे व डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपस्थित बौद्ध उपासक, उपासिका व नागरिकांनी मनोभावे ● पान ४ वर . . .

# श्रावस्ती बुद्ध विहारात ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा.

### ➤ बुध्द धम्माचे आचरण करुन धम्मकांतीचे चक्र गतीमान करू -- सचिन उजगरे

➤ माजलगाव : अरविंद ओव्हाळ

आपसातील मतभेत व इतरांचे अवगुण काढण्यापेक्षा बुद्ध धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी बुद्ध विचारांचे आचरण करुन धम्मकांतीचे चक्र गतीमान करूया असे मत वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष सचिन उजगरे यांनी ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दि .२ ऑक्टोबर गुरुवार रोजी श्रावस्ती बौद्ध विहार केसापुरी वसाहत येथील आयोजित कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले .

यावेळी विचारपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव, डॉ .श्रीराम खळगे, भगवान सातपुते, पांडुरंग जाधव, अॅड .दशरथ मकसरे, रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे , वंचित बहुजन आघाडीचे अंकुश जाधव, ज्येष्ठ आंबेडकरी नेते कचरू खळगे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्ह्याचे नेते धम्मानंद साळवे, जिल्हा उपाध्यक्ष भारत तांगडे, उत्तम जोगदंड, रणजीत घनघाव, सुमंत गायकवाड, अॅड .विजय मस्के, संपादक सुभाष बोराडे, पत्रकार राज गायकवाड यांची उपस्थिती होती .कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदना, त्रिशरण व पंचशील ग्रहणाने झाली . विहार परिसरात सर्वांनी एकत्रितपणे “बुद्धं शरणं गच्छामि” असा घोष करून वातावरण धम्ममय केले .बुद्ध व डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली .

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन उजगरे यांनी प्रमुख पाहुण्यांनी धम्मदेशनामध्ये डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे घेतलेल्या ऐतिहासिक धम्मदीक्षेचा उल्लेख करत धम्मक्रांतीचा संदेश दिला .धम्मप्रवचनात समानता, बंधुता, स्वातंत्र्य, करुणा व न्याय या बौद्ध धम्माच्या तत्त्वांवर सविस्तर प्रकाश टाकण्यात आला .

गौतम घनघाव यांनी बुद्धगीतं सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली . बौद्ध उपासक व उपासिकांची उपस्थिती लक्षणीय होती .





सामूहिक बुद्ध वंदना पठणाने उपस्थितांनी धम्ममय ऊर्जा अनुभवली .धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त श्रावस्ती बुद्ध विहार परिसर फुलांच्या तोरणांनी, बुद्ध ध्वजांनी व प्रकाशयोजनेने सजविण्यात आला होता .वातावरणात नमो बुद्धाय, जय भीमचा घोष घुमत होता .
यावेळी सदधम्म सेवा संघाचे सदस्य , मळीबा चांदमारे, नवनाथ शिनगारे, रविकांत उघडे , विजय होळीकट्टी, विकास डोंगरदिवे, धम्मपाल जावळे, विकास डोंगरदिवे तर, राजकुमार सोनवणे , दिलीप मकसरे , भीमराव कांबळे, संघर्षकुमार ओवे, सुमेध जाधव, वंदनाताई भालेराव, किरणताई ढाकरगे, शोभाताई मकसरे, सुभाष चंदनशिव, वंदनाताई शिनगारे , आशाताई शिरसट, छायाताई वाघमारे, सविताताई जाधव, दीक्षा मस्के, अलकाताई घनघाव, पद्मिनी मस्के , वृंदावनी मस्के , अनिताताई गायकवाड, पुष्पाताई रणदिवे, आदी मान्यवर उपस्थित होते .शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष पांडुरंग जाधव यांनी केले . शरणत्य घेऊन कार्यक्रम संपन्न झाला .

# प्राध्यापकांच्या प्रशिक्षणातून संशोधन वृत्ती वाढीस लागेल - प्रा. मनीषा जाधव

## निवड वेतनश्रेणी प्रशिक्षण प्रमाणपत्राचे शिस्तबद्ध वितरण संपन्न

बीड ( प्रतिनिधी )
महाराष्ट्र राज्य शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे अंतर्गत जून - २०२५ मध्ये पार पडलेल्या दहा दिवसीय उच्च माध्यमिक प्राध्यापकांच्या निवड श्रेणी प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वितरण आज बीड येथे द .बा . घुमरे हायस्कूलमध्ये अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडले .

अत्यंत परिश्रम आणि अभ्यास पूर्ण संपन्न झालेल्या या प्रशिक्षणातून चोवीस वर्षे पूर्ण झालेल्या उच्च माध्यमिक शिक्षकांनी प्रशिक्षण पूर्ण केले होते .

या प्रशिक्षणाचा निकाल जाहीर झाला असून उत्तीर्ण प्रमाणपत्राचे वाटप आज प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख डॉ .विक्रम सारूक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणाचे ज्येष्ठ मार्गदर्शक राम सालगुडे सर, ज्येष्ठ सुलभक तथा मार्गदर्शक श्रीमती मनीषा जाधव, डॉ . शिराज खान पठाण, श्रीमती शेख खदिरा मॅडम, श्रीमती कामलक्ष्मी पारगावकर यांच्या हस्ते जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थी प्राध्यापकांना प्रमाणपत्राचे सन्मानपूर्वक वितरण करण्यात आले .



दरम्यान, या प्रशिक्षण प्रमाणपत्राच्या माध्यमातून आम्हाला नवा आत्मविश्वास अध्यापन आणि संशोधनासाठी मिळेल असा विश्वास ज्येष्ठ प्रशिक्षणार्थी प्रा . रवी दादा चौधरी, प्रा . मासाळ, प्रा . बिभीषण चाटे, प्रा .गुट्टे सर, प्रा . पवार सर, प्रा . आटोळे, प्रा . किरण मधुरे, प्रा . सुरज कुमार मुंडे, प्रा . व्हि .डी . शिंदे, प्रा . फुलचंद ठोंबरे, प्रा . आत्माराम झिंजुर्डे, प्रा . मुरलीधर राठोड, प्रा .चंदनशिव, प्रा .दत्तात्रय नेटके, प्रा . वाणी, प्रा . अनिल जोगदंड, प्रा . सिद्धीकी, प्रा . देशमुख, यांच्यासह प्रशिक्षणार्थी उच्च माध्यमिक शिक्षक बांधवांनी व्यक्त केला .

### प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीसाठी शिक्षक ध्यास घेतील!

● उच्च माध्यमिक शिक्षकांनी जून 2025 मध्ये दहा दिवशीय प्रशिक्षण अत्यंत शिस्तबद्ध आणि परिश्रमक पूर्वक घेतले . या प्रशिक्षणात सुलभकांनी केलेले मार्गदर्शन . . संशोधन वाढीसाठी दिलेल्या युक्त्या यातून उच्च माध्यमिक शिक्षक कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना नवीन संशोधन आणि त्यातून राष्ट्रप्रेमी नागरिक घडवण्यासाठी सिद्ध होईल ! असा विश्वास प्रशिक्षणा मधील सूत्रसंचालक प्रा . बिभीषण चाटे यांनी आज वितरण प्रसंगी व्यक्त केला .

# विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू; माजलगावात सिंदफणा नदीकाठच्या पुराने तुटलेल्या तारांनी घेतला जीव

माजलगाव / प्रतिनिधी :
सिंदफणा नदीकाठी मागील पंधरा दिवसांपूर्वी आलेल्या पुराच्या वेळी विजेचे पोल पडून विजेच्या तारा खाली पडलेल्या होत्या . त्या तारेस स्पर्श होऊन अरबाज शाहिद शहा वय वर्ष ३० या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली .


मागील पंधरा दिवसात पावसाने प्रचंड हाहाकार उडवून दिल्याने माजलगाव धरण भरले व त्यातून सिंदफणा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात जवळपास पंधरा दिवस सतत विसर्ग होत राहिल्याने नदीकाठी असलेले विजेचे पोल व तारा खाली पडल्या .

त्या अद्याप दुरूस्त करण्यात आलेल्या नाहीत . शहरातील मोगल मोहल्ला भागातील शाहिद अहमद व त्याचा मित्र शेख जकीर हे दोघे शुक्रवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास कब्रस्तानजवळून नदीवर अंघोळीसाठी जात असताना रस्त्यात काही लोक ‘ लाईटचा शॉक लागून माणूस पडलेला आहे, असं ओरडून सांगत होते . ’



त्यावेळेस हे दोघे तेथे गेले असता त्यांच्या गल्लीतील अरबाज शाईन शहा हा तरुण तारेला चिकटून बेशुद्ध पडलेला दिसून आला . त्यावेळी या दोघांनी लाकडी काठीने त्याच्या अंगावरील तार बाजूला केली व त्यास मोटरसायकलवरून तात्काळ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले . या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे .

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. ‘शुक्रतारा’ हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर



विशेष



## स्वामी विवेकानंद विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

माजलगाव / प्रतिनिधी : शहरातील स्वामी विवेकानंद विद्यालयात दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप हे तर प्रमुख उपस्थितीत प्रशांत खडके, सोनाजीराव अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य एकनाथ चव्हाण, अरुण माने, बालाजी तिडके, श्रीकृष्ण थेटे, लक्ष्मी अहंकारे, हेमलता भोसले, मोहिनी जाधव, शरद राठोड, शरद जावळे, विनायक चौरे, वैभव सोळुंके यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जीवन चरित्र विद्यार्थ्यांसमोर मांडले तर प्रमुख पाहुणे असलेल्या प्रशांत खडके यांनी विद्यार्थ्यांना लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनाविषयी माहिती देत त्यांच्या चरित्रावर प्रकाश टाकला. कार्यक्रमास विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




## सिद्धेश्वर महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार केंद्राचे उद्घाटन

माजलगाव / प्रतिनिधी : भाशिप्र संस्थेच्या येथील सिद्धेश्वर महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार केंद्राचे नुकतेच उद्घाटन उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते. याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. गजानन होंन्ना म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांनी आपल्या महाविद्यालयास वेगवेगळे आठ कोर्सेस आजीवन शिक्षण विस्तार विभाग अंतर्गत राबवण्यास दिले आहेत. ते आपण महाविद्यालय म्हणून प्रभावीपणे राबवू. अध्यक्षीय समारोपातप्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, कौशल्य विकास व्हावा या दृष्टीने विद्यापीठाने दुग्ध व्यवसाय, ड्रेस मेकिंग अँड डिझायनिंग, बालवाडी अंगणवाडी, ग्रामीण पत्रकारिता, ग्रंथालय व्यवस्थापन, विक्री प्रतिनिधी, सौंदर्य संवर्धन व व्यक्तिमत्व विकास, सर्टिफिकेट कोर्स इन इनकम्युनिकेटिव्ह इंग्लिश हे सर्व कोर्सेस सुरू केले आहेत. समाजातील वेगवेगळे घटक जे दहावी व बारावी उत्तीर्ण आहेत असे व्यक्ती या कोर्सेसला प्रवेश घेऊ शकतात व आपला कोर्सेस पूर्ण केल्यानंतर या माध्यमातून ते आपला स्वयंरोजगार प्राप्त करू शकतात. प्रास्ताविक समन्वयक डॉ. बाळासाहेब मुंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी केले तर आभार प्रा. अशोक होके यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## ४ ते ७ ऑक्टोबर दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता



पुणे/मुंबई : भारतीय हवामान विभागाने (IMD) अरबी समुद्रात विकसित होत असलेल्या 'चक्रीवादळ शक्ती' च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांसाठी इशारा जारी केला आहे. ४ ते ७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वारा आणि समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

### चक्रीवादळाचा इशारा

अरबी समुद्रात 'चक्रीवादळ शक्ती' तयार होत असल्याने, ३ ते ७ ऑक्टोबर दरम्यान मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये उच्च ते मध्यम स्वरूपाचा इशारा कायम राहणार आहे.

३ ऑक्टोबर रोजी उत्तर महाराष्ट्र किनारपट्टीवर वाऱ्याचा वेग ४५-५५ किमी प्रतितास होता, जो ६५ किमी प्रतितास पर्यंत वाढू शकतो. चक्रीवादळाच्या स्थितीनुसार यात वाढ होण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्र किनारपट्टीवर समुद्राची स्थिती अत्यंत धोकादायक राहील. मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा स्पष्ट सल्ला देण्यात आला आहे.

उत्तर कोकणात आर्द्रतेच्या प्रवेशामुळे आणि ढगांच्या निर्मितीमुळे सखल भागात पूर येण्याचा धोका आहे. पूर्व विदर्भ आणि मराठवाड्याच्या अंतर्गत जिल्ह्यांमध्येही जोरदार ते अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

या हवामान इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने जिल्हा प्रशासनांना संभाव्य आपत्कालीन परिस्थितीसाठी पूर्णपणे तयार राहण्याचे निर्देश दिले आहेत. किनारी पट्ट्यातील आणि पूरप्रवण भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी स्थलांतर योजना तयार ठेवण्यास सांगण्यात आले आहे. नागरिकांनी आवश्यक वस्तूंचा साठा करून ठेवावा, मुसळधार पावसादरम्यान घराबाहेर अनावश्यक प्रवास टाळावा आणि अधिकृत सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# श्रावस्ती बुद्ध विहाराकडे बौद्ध समाजाची पाठ

## ➤ सद् धम्म सेवा संघाने शील व पंचशिलेचे पालन करावे - विजय साळवे



➤**माजलगाव : प्रतिनिधी**
श्रावस्ती बुद्ध विहार, माजलगाव येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात समाजाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. या पार्श्वभूमीवर रिपाइं जिल्हाध्यक्ष विजय साळवे यांनी बौद्ध समाजाने विहाराकडे का पाठ फिरवली? असा थेट सवाल उपस्थित करत सद् धम्म सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांना परखड शब्दांत कान टोचले.

साळवे म्हणाले, श्रावस्ती बुद्ध विहार हे संपूर्ण समाजाचे आहे. विहार समाजाचे आहे ही भावना लोकांच्या मनात निर्माण करण्याची जबाबदारी धम्मचळवळ चालविणाऱ्यांवर आहे. मात्र समाजामध्ये 'हे विहार आपले नाहीत' असे मत का तयार होते, याचे आत्मपरीक्षण झाले पाहिजे. विहार म्हणजेच समाजाचे आध्यात्मिक केंद्र. त्यामुळे शील व पंचशीलाचे आचरण नेतृत्वाने प्रथम करून दाखवले पाहिजे.

ते पुढे म्हणाले की, श्रावस्ती बुद्ध विहाराला दीक्षा भूमीप्रमाणे मानले जाते. मग समाज तिथे यायला का कचरतो? समाजाच्या मनात विहाराविषयी आपलेपणाची भावना कमी होण्यास कोण जबाबदार आहे, हे तपासले गेले पाहिजे. भविष्यातील परिस्थिती गंभीर आहे. मनुवादी व्यवस्था सत्तेवर बसली असून हळूहळू आरक्षण व सवलती संपवल्या जात आहेत. पुढील पिढ्यांसाठी मोठा संघर्ष उभा आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालत समाजाने संघटित व्हावे, हेच काळाचे महत्त्वाचे आव्हान आहे.

या कार्यक्रमाला कचरु तात्या खळगे, डॉ. श्रीराम खळगे, धम्मानंद साळवे, सचिन उजगरे, उत्तम जोगंदड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कचरु तात्या खळगे यांनीही विचार मांडून उपस्थितांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास नवनाथ शिनगारे सर, दशरथ मकसरे, सद् धम्म सेवा संघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव, जी. एन. घनघाव, भगवान सातपुते, पांडुरंग जाधव यांच्यासह पदाधिकारी, उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन ६९वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात साजरा





➤**माजलगाव : प्रतिनिधी**
भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन ६९ वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला सकाळी ठिक ९ वा माजलगाव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकानी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन धम्मरॅली स सुरुवात करण्यात आली व सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते रॅलीचा समारोप करुन पुज्य भन्ते धम्मप्रिय थेरो चैत्यभूमी दादर मुंबई यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे पर्यटन सचिव के व्ही साळवे सर हे होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा संस्कार उपाध्यक्ष लिलाताई उजगरे, जिल्हा महिला संस्कार सचिव आशा ताई मोरे, जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, महिला जिल्हा संघटक शोभाताई भोजने, जिल्हा संघटक बी सी डोंगरे, महिला तालुका अध्यक्ष मंदाताई साळवे, शेलापुरीच्या उपसरपंच शुशिलाताई घडसे यांच्या सह धम्म उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के यांनी केले प्रमुख मार्गदर्शक के व्ही साळवे सर यांनी अशोका विजयादशमी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती गतीमान कशी करावी ह्या विषयी विविध मुद्या द्वारे मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वंदनाताई घनघाव यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, नाथाजी घडसे, किसन भदरगे, नितिन डोंगरे, गुलाब धाईजे मोहन काकडे, डी पी वाघमारे नाना, डी एस साळवे दादा, दयानंद साळवे, भानुदास साळवे, राजेभाऊ साळवे समाधान साळवे, अमोल टाकणखार, बाबासाहेब घनघाव, शिवाजी कासारीकर, सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



## दीपकभाऊ बोराडे यांना सोन्नाथडी येथील सेवा सोसायटीचा जाहीर पाठिंबा

माजलगाव : धनगर समाजाच्या एस.टी. आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी या जिव्हाळ्याच्या मागणीसाठी मल्हार योद्धे दीपक भाऊ बोऱ्हाडे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला १५ दिवस पूर्ण झाले आहेत. या आंदोलनाच्या समर्थनार्थ तालुक्यातील सोन्नाथडी येथील सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने एक ठराव घेऊन जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. येथील धनगर समाजाचे नेते मा सभापती कल्याण आबुज यांना सदरील ठवाची प्रत त्यांच्या निवासस्थानी देण्यात आली आहे या निवेदनात म्हटले आहे की, सकल धनगर समाज हे ओ.बी.सी. मध्ये होते. परंतू आता त्यांना हैद्राबाद गॅजेटनुसार एस.टी. प्रवर्गातून आरक्षण मिळण्यासाठी सेवा सहकारी संस्था मर्या. सोन्नाथडी या संस्थेचे चेअरमन अनंतराव लक्ष्मणराव डक व समस्त संचालक मंडळ आपणास जाहीर पाठींबा देत आहोत. आपल्या सकल धगनर समाजाला हैद्राबाद गॅजेटनुसार एस.टी. प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी आम्ही आपल्या सोबत आहोत. आपल्या सामाजिक कार्याला यश संपादन होवो हिच ईश्वर चरणी प्रार्थना या वेळी सेवा सहकारी संस्था सोन्नाथडी चेअरमन श्री अनंत भैय्या डक यांच्या सोबत श्री बालाजी वगरे, श्री. दत्तात्रय बोरकर, श्री रामेश्वर डाके, आणी कुलदीप वगरे व संचालक मंडळ उपस्थित होते.

## पैठण तालुक्यातील ठिकठिकाणी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन साजरा

● पान ३ वरून...
अभिवादन केले. या वेळीमाजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, डॉ. पंडीत किल्लारीकर, मा. नगरसेवक अजित पगारे, जालिंदर आडसुळ, राजू परदेशी, सुमित मगरे, भारत आठवले, अरुण बल्लाळ, दशरथ आडसुळ, अॅड. सुभाष खडसन, सुनील अडसूळ, गौतम बनकर, मोतीलाल घुंगासे, नंदकिशोर मगरे, रितेश पहिलवान, ज्ञानेश्वर आडसुळ, शाहीर सुरेश सदावर्ते, अॅड प्रमोद सरोदे, कल्याण मगरे, प्रमोद कुंडारे यांच्यासह इतर अनेक बौद्ध उपासक व उपासिकांची उपस्थिती होती. तसेच कातपूर ग्राम पंचायत अंतर्गत येणाऱ्या राहुल नगर येथे धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमावेळी तथागत गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी कातपूर ग्राम पंचायतचे उपसरपंच विजय खडसन, ग्रा.प.सदस्य भाऊसाहेब खुटेकर, आशिषकुमार जाधव, गंगाधर म्हस्के, शिक्षक शौकत पठाण, निवृत्ती जमधडे, अनिल पवार, कैलास बर्फे, रमेश खडसन, रामदास पंडित सुरेश वाहुल, बाळू गायकवाड, राहुल गायकवाड, लहू पहिलवान, मोती गिऱ्हे आसाराम हिवराळे, विकास काळे यांच्यासह ईतर बौद्ध उपासक उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# देशपांडे हॉस्पिटल चा स्तुत्य उपक्रम राजेगावात पूरग्रस्तांसाठी मोफत आरोग्य शिबीर; 140 जणांची तपासणी

➤**माजलगाव : प्रतिनिधी**
भयानक पुरामुळे स्थलांतरित झालेल्या नागरिकांची येथील देशपांडे हॉस्पिटल च्या वतीने आरोग्य तपासणी शिबीर तालुक्यातील राजेगाव येथे बुधवार दि. रोजी सकाळी १० ते १ च्या दरम्यान घेण्यात आले. यात १४० रुग्णांची तपासणी अगदी मोफत करण्यात आली. देशपांडे हॉस्पिटल ऑण्ड हार्ड केअर चे डॉ. श्रेयस देशपांडे यांच्या पुढाकारातून पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा पुढे करून यावेळी पूरग्रस्त नागरिकांची मोफत उपचार सेवा करण्यात आली.

राजेगाव येथे बुधवारी सकाळी १० ते १२ च्या दरम्यान मोफत आरोग्य शिबीर उपचार सेवा दिली. यावेळी पुरामुळे स्थलांतरित झालेल्या नागरिकांची १४० लोकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यात १४ रुग्णांचे इसीजी, ४० रुग्णांचे बीएसएल करण्यात आले. त्यांना आरोग्य विषयक जागरूक राहण्याचा सल्ला दिला.



यावेळी तीन डॉक्टर, टेक्निशियन टीम, लॅब असिस्टंट यांनी परिश्रम घेतले. दरम्यान डॉ. श्रयेश देशपांडे यांच्या पूरग्रस्तांसाठी पुढे केलेल्या एक हात मदतीने मोठा दिलासा मिळत आहे. ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाचे आपण काही देणं लागतो हा उदान्त हेतू ठेऊन ही सेवा माझ्या कडून घडली असे डॉ श्रेयस देशपांडे यांनी बोलताना सांगितले.

# शारदीय नवरात्रौत्सव, विजया दशमी निमित्त माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन चोख बंदोबस्त

➤**माजलगाव : प्रतिनिधी**
शारदीय नवरात्रौत्सव विजया दशमी निमित्ताने अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे आदेशाने आणि प्रशासकीय अधिकारी प्रकाश बताडे केंद्र नायक सुरेंद्र जव्हेरी यांचे सुचणे प्रमाणे माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन चे पो नि कोळी ए पी आय पांडव ए पी आय सोनवळे यांचें मार्गदर्शना खाली अत्यंत चोख बंदोबस्त गृहरक्षक दलाचे जवान गेल्या दहा दिवसानं पासून नैसर्गिक आपत्तीत पुर परिस्थिती त प्रमाणिक पणे पार पाडत असुन विजया दशमी निमित्ताने मौजे मनूर व जायको वाडी येथे व ग्रामीण हदित



इतर ठिकाणी गृहरक्षक दलाचे जवान जबाबदारी ने बंदोबस्त पार पाडत असुन त्यांना वेळोवेळी पलटून कमांडर शेख बाहोधीन बाबासाहेब कुलथे अविनाश उंबरे जवान शेख इरफान शेख शब्बीर महिला माने मार्गदर्शन करत आहेत हे जवान कुणाकडून हि कशाची हि अपेक्षा न करता स्वत: च्या गाडीत स्वत: पेट्रोल भरून प्रमाणिक बंदोबस्त करतांना दिसतात या जवानांना पो नि कोळी यांचे पण चांगले सहकार्य मिळत असलेले काही जवानांनी सांगितले असुन गृहरक्षक दलाच्या जवानांचे नेहमी च प्रत्येक पोलिस स्टेशन ला चांगले सहकार्य मिळते व हे जवान उन पाऊस थंडी चा विचार न करता तिस तिस कीलो मिटर ग्रामीण हदित चांगले प्रकारे बंदोबस्त करतांना दिसत असल्याने या जवानांचे जनतेतून कैवतुक होत असुन या मध्ये माऊली चौरे जितेंद्र कुलथे मुजू हबीब बबन साळवे महिला शम्मीम माने कीर्ते राऊत हे व इतर जवान मनूर रेणूका माता देवी मंदिर व परिसरात मागिल दहा दिवसांन पासून उत्कृष्ट बंदोबस्त करतांना दिसत आहेत.

## डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मैदानी स्पर्धेत यश




➤**माजलगाव : प्रतिनिधी**
तालुक्यातील टाकरवन येथील डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत लांब उडी मध्ये इयत्ता आठवीतील श्रुती बनगर द्वितीय क्रमांक, इयत्ता दहावीतील कुमारी प्रतीक्षा गरड प्रथम क्रमांक, आणि १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत इयत्ता दहावीतील कुमारी आश्विनी कदम प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाल्याबद्दल या विद्यार्थ्यांचे सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष-मा. शिवाजीराव भाऊ रांजवण, सचिव - प्रताप भैय्या रांजवण मुख्याध्यापक श्री राऊत डी एम. सर पर्यवेक्षक श्री सातपुते सर, क्रिडा शिक्षक श्री इंगोले सर, व त्यांना सहकार्य करणारे शेख सर, यांचे सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) जिल्हा व तालुका कार्यकारिणी जाहीर

➤**माजलगाव : प्रतिनिधी**
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गट) पक्षाच्या जिल्हा व तालुका पद नवनियुक्ती दि. ३०/९/२०२५ रोजी अंबाजोगाई येथील विश्रामगृह येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया( खरात गट) चे बीड जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन संपन्न झाली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गट पक्षाच्यावतीने बीड जिल्हा सरचिटणीस पदी नईम करीम आतार, महिला जिल्हा उपाध्यक्ष बीड पदी सुमित्रा नाईकनवरे, माजलगाव तालुकाध्यक्षपदी खलील इस्माईल शेख, माजलगाव तालुका उपाध्यक्ष



पदी शेख एकबाल मुस्तफा, माजलगाव तालुका सचिव पदी कुरेशी सलाम अब्दुल हक, तालुका संघटक केशव खरात, तर पात्रुड जिल्हा परिषद सर्कल अध्यक्ष पदी त्रिंबक थावरे, यांची निवड झाली आहे तर माजलगाव महिला तालुका अध्यक्षपदी स्वातीताई वाघमारे, यांची नियुक्ती करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात गट राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात यांचे विचार समाजामध्ये रुजवून दलित, शोषित, पीडित, वंचित, आदिवासी, मुस्लिम, बहुजन वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढत राहावे देशात अस्तित्व असलेल्या मनुवादी व्यवस्थे विरोधात संविधानाच्या रक्षणासाठी लढा तीव्र करा.

जनसामान्याच्या मूलभूत प्रश्नासाठी आंदोलनात्मक तसेच राजकीय सामाजिक पवित्रा घेऊन जनआंदोलन उभे करा दलित अत्याचार ही राष्ट्रीय आपत्ती सारखी परिस्थिती असून दलित अत्याचार विरोधात आवाज उठविण्याचे काम करा जातीयता ही कोरोनापेक्षाही भयानक व्हायरस आहे हा व्हायरस नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत रहावे शहर तालुका गाव पातळीवर पक्ष बांधणी करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात हा पक्ष आणखी मजबूत करा. त्यामुळे आपल्यावर दिलेल्या जबाबदारीला आपण न्याय द्याल पक्षाच्या ध्येय धोरणानुसार काम कराल अशी अपेक्षा आहे.

अशा आशयाचे नियुक्तीपत्र देऊन सर्व नवनियुक्त जिल्हा व तालुका कार्यकारणी शुभेच्छा देण्यात आल्या.

## राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी



माजलगाव : लोकनेते सुंदर रावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि. सुंदरनगर तेलगाव कार्यालयात २ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी करनेत आली. प्रतीमेस विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, दासराव मोरे, महादेव मुरकुटे.